# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** वाशिम **Year (वर्ष):** 2020
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0656 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/06/2020 15:27 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Date From (दिनांक पासून):** 24/06/2020
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/06/2020
**Time From (वेळेपासून):** 14:10 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 26/06/2020 **Time (वेळ):** 15:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 020 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/06/2020 15:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसील कार्यालय वाशिम,वाशिम

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** निवती भिमराव बो-हाडे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,वाशिम,वाशिम,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,वाशिम,वाशिम,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कैलास विठलराव रोही | | | 1. चामुडादेवी मदीरा जवळ वाशिम,वाशिम, वाशिम,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | माधव रामचन्द्र कुलकर्णि | | | 1. गाडगेनगर केळी रोड मालेगाव,वाशिम, वाशिम,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

ला.प्र.वि.,वाशीमदिनांक:-26.06.2020मी निवृती भिमराव बो-हाडे, वय -40 वर्ष व्यवसाय - नोकरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशीम. सरकार तर्फे फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशीम येथे पोलीस निरीक्षक या पदावर दि. 03.07.2015 पासुन कार्यरत आहे. दि.24.06.2020 रोजी मी , वाशीम येथे हजर असतांना तक्रारदार भानुदास किसन खंडागळे, वय 62 वर्श,धंदा-शेती, रा.अडोळी ता.जि., वाशीम हे ला.प्र.वि कार्यालय , वाशीम येथे आले. लाच मागणी बाबत तक्रार असल्याचे सांगीतले. कार्यकारी अभियंता, , वाशीम पाटबंधारे विभाग, , वाशीम यांना दोन कर्मचारी पंच म्हणुन मिळणेकरीता गोपनिय पत्र देवुन दोन पंच कर्मचारी उपलब्ध करुन घेतले. तक्रारदार यांना लिहीता वाचता येत नसल्याने पंचं क्र.2 श्री.रवि नागोराव ठेंगडे यांनी तक्रारदार यांचे सांगणे प्रमाणे तक्रार लिहीली, ती पुढील प्रमाणे.तक्रार दि.24.06.2020 प्रति,पोलीस निरीक्षक,अँन्टी करप्षन ब्युरो , वाशीम, वीषय- लाच मागणे बाबत तक्रार. तक्रारदार:- भानुदास किसन खंडागळे, वय 62 वर्ष धंदा-शेती, रा.अडोळी ता.जि., वाशीम मो.नं.7499354377,महोदय, वरील विषयान्वये तक्रार देतो कि, मी वरील ठिकाणी राहत असुन शेती करतो.माझे भाऊ नामदेव किसन खंडागळे, डिगांबर किसन खंडागळे व बहीण जाईबाई दगडू साखरे यांची सामाईक शेती 1.09 हेक्टर जमीन आहे. सदर सामाईक जमीन खातेफोड करण्यासाठी आम्ही आमचे गावचे तलाठी रोही साहेब यांना भेटलो. माझा भाऊ डीगांबर किसन खंडागळे याला परालेसीस झाल्याने त्याचे औषध उपचारासाठी त्याची जमीन विकायची आहे म्हणुन मी व माझा पुतण्या माधव असे तलाठी साहेबांना 8 दिवसापुर्वी भेटलो होतो, तेंव्हा त्यांनी सामाईक क्षेत्र वेगळे करुन देण्यासाठी चार जणांचे प्रत्येकी 12,500/-रुपये असे एकुण 50,000/-रु.ची लाचेची मागणी केली. रोही साहेबांचे म्हणण आहे कि, मंडळ अधिकारी साहेब त्या शीवाय नाही म्हणतात. साहेब 50,000/-रुपये पेक्षा कमी पैशात करत नाही.सदर कामासाठी कोणत्याही प्रकारची फि लागत नाही. आज रोजी त्यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी बोलावले आहे. आमचे काम अडले असल्यामुळे आम्ही पैसे देण्याचे कबुल केले आहे.माझी त्यांना लाच देण्याची इच्छा नाही.त्यांच्यावर कारवाई होण्यास विनंती आहे. अशी तक्रार दिली. दोन्ही पंचांनी तक्रारीवर सहया केल्या. तक्रारदार व पंचास व्हाईस रेकॉर्डर चे कार्यप्रणालीबाबत माहीती दिली व पडताळणी दरम्यान तक्रारदार व पंचानी करावयाचे कृती संबधाने सुचना दिल्यात्याबाबत तक्रार संबंधाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा पडताळणी पुर्व पंचनामा दि.24.06.2020 रोजी करण्यात आला.तक्रारदार व पंच क्र.1, यांना पडताळणी कार्यवाही संबंधी आवश्यक त्या सुचना देवून तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदाराचे शर्टाचे आतील बाजुस पिन करुन देवुन तलाठी रोही यांची भेट घेणेकरीता 14.10 वा. सुमारास तहसिल कार्यालय , वाशीम येथे रवाना केले. पडताळणी दरम्यान, तलाठी रोही यांनी तक्रारदार यांना काय म्हणता सांगा असे म्हटले तर तक्रारदार यांनी तलाठी रोही यांना भाऊ बिमार आहे दवाखान्यात आहे.... थोडे पैशाच काम



Scanned with CamScanner

आहे म्हणुन म्हणलं साहेबांल भेटुन घ्याव लवकरात लवकर नोंदी करायसाठी असे म्हटले. रोही तलाठी यांनी तक्रारदार यांना तुकडयाच आहे त्याच्यामुळे होत नाही असे म्हटले. तक्रारदार यांनी तलाठी रोही यांना बोलुन घ्या न काय खर्च आहे असे म्हटले. तर तलाठी रोही यांनी तक्रारदार यांना सांगीतल म्या त्याच्या कमी होत नाही तुकडयाच असल्यामुळे ते कुठच होत नाही असे म्हटले व मोबाईल वरुन गावचे मंडळ अधिकारी श्री.कुलकर्णी यांना बोलावुन घेतले. मंडळ अधिकारी यांनी तहसिल इमारतीचे आत बोलावले. तक्रारदार यांनी मंडळ.अधिकारी कुलकर्णी यांना नोंदी करायच्या बिमार आहे आमचा गडी... त्यासाठी म्हटल लवकरात लवकर कराव, काही कराव पैशची अडचण जरा असे म्हटले तर मंडळ अधिकारी कुलकर्णी यांनी रजिस्टर नोंदी करुन टाकानं त्या ऑफिसला जावुन किती किती गुंठयाच्या जागा.. रजिस्टर वाटणी पत्र आणुन दया साहेबाला आम्ही करुन टाकु असे सांगीतले. तेंव्हा रोही तलाठी यांनी मंडळ अधिकारी यांना ते पोरगा आलता ते सांगीतल असे सांगीतले.तक्रारदार यांनी त्यांना मग पोरगा विचारासाठी आलता ते म्हणत देवुन घेवुन असे म्हटले. मंडळ अधिकारी यांनी तक्रारदार यांना परवडत नाही त्यापेक्षा राहीलेल पुरलं उगीच कशाला ... ते बोलतात मग मुलासोबत कांय बोलायचं ते असे म्हटले. रोही तलाठी यांनी सांगीतल ना असे म्हटले तर मंडळ अधिकारी यांनी सांगीतल ना मग काही प्रश्नच नाही सांगीतल म्हणतात काय जे सांगायच ते असे म्हटले. तसेच मंडळ अधिकारी यांनी तक्रारदार यांना नाही...नाही चार-चार लोकायला एकच गोष्ट सांगायची, मधात समजा अजुन एखादा भाऊ यायचा, चैथा तो म्हणन मल सांगा, त्यानंतर चैथा येईल मल सांगा ते नाही, एकदा सांगीतलं.... मग तुम्ही तुमच्या मुलाला विचारुन घ्या काय सांगेल आहे असे म्हटले. तक्रारदार यांनी त्यांना मुलगा जरी असल तरी आमच्या कानावर असे म्हटले. मंड्ळ अधिकारी यांनी तक्रारदार यांना त्यायले बोलुन पहा काय म्हणतात ते...... एकदा मुलाला विचारा मग मुलाला विचारल्यावर यायले भेटा असे म्हटले. तक्रारदार यांनी त्यांना त्याले विचारल पण त्याने सांगीतल पण तस थोडा फार कमी कराव अशी माई इच्छा होती दुसर काही नाही आं असे म्हटले.रोही तलाठी यांनी मंडळ अधिकारी कुलकर्णी यांना ते तुम्ही म्हटले ते सांगीतले त्याचे अर्धे सांगीतले आपण असे म्हटले.तसेच तक्रारदार यांना रोही तलाठी यांनी एकाचे 25 सांगीतले होते, चौघाचे एक सांगीतले होते त्यातले अर्धे सोडुन दया अर्धे सांगीतले .....साहेबाने एका एकाचे 25-25 सांगीतले होते, तुमची गरीबी आहे म्हणुन साहेबाला सांगुन हे ते तसा विषय आहे असे म्हटले. तक्रारदार यांनी रोही तलाठी यांना एका एकाचे प्रत्येकी 25-25 सांगीतले होते नाही का, आता ते किती सांगीतले त्यायनं त्याले असे सांगीतले. रोही तलाठी यांनी तक्रारदार यांना पन्नास... साडेबारा- साडेबारा ते बी तुमची परीस्थिती पाहुन असे म्हटले. तक्रारदार यांनी रोही तलाठी यांना पन्नास सांगीतले, नाही काय त्यायनं असे म्हटले. रोही तलाठी यांनी तक्रारदार यांना साहेबान एका एकाचे 25-25 सांगीतले असे म्हटले. तक्रारदार यांनी रोही तलाठी यांना मल वाटते थोडे फार तरी हे कराव मले अस वाटा लागल असे म्हटले. त्यावर रोही तलाठी यांनी तक्रारदार यांना मी काहीच करु शकत नाही तुम्ही साहेबाला बोलुन घ्या त्या असे म्हणुन तलाठी रोही यांनी तक्रारदार यांना पन्नास हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे तसेच श्री.कुलकर्णी मंडळ अधिकारी यांनी श्री रोही यांना लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. त्या संबंधाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा पडताळणी पंचनामा करण्यात आला.सापळा कारवाई दि. 25.06.2020 रोजी करण्याचे ठरले.दि.25.06.2020 रोजी पंचासह कार्यालयात हजर होतो..तक्रारदार बराच वेळ झाला तरी कार्यालयात आले नाही म्हणुन आम्ही त्यांना फोन केला असता तक्रारदार यांनी सांगीतले कि, आपण अडोळी येथे यावे. मला येणे शक्य नाही. म्हणुन आम्ही दोन्ही पंच व स्टाफसह अडोळी येथे जावुन तक्रारदार यांची भेट घेतली. तक्रारदार यांनी सांगीतले कि, काल संध्याकाळी मी माझ्या भावाला व पुतण्याला कारवाई बाबत सांगीतले असता, माझा भाऊ व पुतण्या मला म्हणाले कि, आपण जर कारवाई केली तर आपल्याला त्रास होईल. तलाठी व मंडळ अधिकारी हे आम्हाला त्रास देण्याची शक्यता आहे.त्यामुळे आमचे कुटूंब दहशतीत आहे. माझ वय जास्त आहे. त्यामुळे तब्येत बरी राहत नाही. त्यामुळे मी पुढील कारवाई करु इच्छीत नाही. आपण योग्य कारवाई करावी असे सांगीतले. तसा सविस्तर जबाब नोदवुन पंचनामा करण्यात आला. एकंदरीत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारी वरुन दि.24.06.2020 रोजी तहसिल कार्यालय , वाशीम येथे 14.10 ते 15.05वा.दरम्यान पडताळणी केली. आरोपी लोकसेवक कैलास रोही तलाठी व माधव कुलकणी मंडळ अधिकारी यांनी स्वतःचे आर्थिक फायदयाकरीता आपल्या पदाचा गैरवापर करुन तक्रारदार यांना त्यांचे भाऊ व बहीण यांचे 1 हेक्टर 09 आर सामाईक शेती वेग-वेगळी करुन देण्यासाठी पडताळणी दरम्यान तलाठी कैलास रोही यांनी तक्रारदार भानुदास किसन खंडागळे यांना 50,000/-रुपयाची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच मंडळ अधिकारी माधव कुलकर्णी यांनी तलाठी कैलास रोही यांचे लाच मागणीला प्रत्यक्ष सहमती देऊन प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपी लोकसेवक 1) कैलास विलराव रोही वय 39 वर्ष तलाठी सांजा-आडोळी रा.चांमुडादेवी मंदीराजवळ वाशीम व आलोसे 2) माधव रामचंद्र कुलकणी वय 54 वर्ष, मंडळ अधिकारी केकतउमरा,तहसिल कार्यालय वाशीम रा.गाडगेनगर,केळीरोड मालेगांव जि. वाशीम यांचे हे कृत्य कलम 7, 12 लाचलुचपत प्रतिबंधक कायदा 1988 (सुधारीत 2018) अन्वये गुन्हा होत असल्याने त्यांचे विरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

**3.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): YOGITA KASHINATH BHARDWAJ(SI (Sub-Inspector)) / POBN84554 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम ख़बर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in Charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): YOGITA KASHINATH BHARD
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): POBN84554

Scanned with CamScanner